# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ५७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–१६/०९/२०१६

**१) अल्पवयीन मुलीला फुस लावुन नेले व तिच्यावर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०९/२०१६ रोजी १०.०० वा. ते १०/०९/२०१६ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादीची भाची ही अल्पवयीन असल्याचे माहीत असतांनासुध्दा यातील आरोपीने तिला फुस लावुन जबरदस्तीने आपल्या सोबत घेवुन जावुन तिचे मनाविरुध्द तिचेवर बलत्कार केल्याने व घडलेला प्रकार कोणास सांगीतल्यास मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पो. स्टे. मोहाडी येथे अप क्र. ००/१६ कलम ३६३,३६६(अ),३७६(२)(आय),५०६ भादवी सहकलम ४, ६ बाल लैगीक अत्याचार कायदा २०१२ चे कागदपत्र पो. स्टे. ला प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोउपनि दुगावकर पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३,३६६(अ),३७६(२)(आय),५०६ भादवी सहकलम ४, ६ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. उईके पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर चालकाच्या निष्काळजीपणामुळे टाटा झेड गाडीला धडक, दोन जखमी . :–**

दिनांक ०७/०९/२०१६ रोजी २२.४५ वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रॅक्टर क्र. एमएच ३१ सीबी ४४०२ चा चालक याने हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे टाटा झेड कंपनीची कार क्र. एमएच ३३ ए ४२२१ ला समोरुन लाखांदुर ते वडसा रोड सोनी शिवार येथे धडक मारुन फिर्यादीस व सोबत असलेल्या मालक जेसालोल मोटवानी रा. विसोरा आणि स्वतःला किरकोळ दुखापत करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी लालाजी आसाराम मेश्राम वय ३२ वर्ष, रा. विसारा जि. गडचिरोली यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भोयर पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) दारुबंदीच्या कारणावरुन महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन धमकी दिली. :–**

दिनांक १४/०९/२०१६ रोजी २१.०० वा. दर. यातील फिर्यादी ही ग्रामपंचायत गोडउमरी येथील ग्र. प. सदस्य असुन गावात महात्मा गांधी तंटामुक्त समिती महिला अध्यक्ष असुन गावातील दारुबंदी करण्याच्या हेतुने गावातील महिलांना प्रोत्साहन दिल्याचे कारणावरुन यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे घरासमोर सार्वजनीक रोडवर येवुन तिचे सोबत तोंडा तोंडी भांडण करुन आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादीला तु बाहेर निघ असे बोलुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन अपमाणीत करुन जिवाने मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २९४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परसुरामकर पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) अपघातात जखमी झाल्याने औषधउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक. १०/०९/२०१६ रोजी २२.३० वा. दर. यातील मृतक सुरेश तेजराम मटाले वय ५० वर्ष, रा. हरदोली याची मोटार सायकल स्लीप होवुन रोड अपघातात जखमी झाल्याने त्यास औषधोउपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. चोले पोस्टे पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वाढीवे पो.स्टे. पालांदुर हे करित आहेत.

५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–

दिनांक १५/०९/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ११२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तिन सिटर वाहनांवरती ०७ केसेस, अवैध प्रवासी ०२ केसेस तसेच ईतर वाहनांवरती १०३ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस अधिकारी
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९९२१७४१६१९

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता